जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 NOV 2017 तरूण भारत

# विकास आघाडीच्या नेत्यांची व्यूहरचना ठरली यशस्वी !

## रयत, विवेकानंद शिक्षण संस्थांमुळे विकास आघाडीला फायदा : मतांसाठी सर्वच आघाड्यांची धावपळ


अहिल्या परकाळे
कोल्हापूर

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणूका नुकत्याच पार पडल्या. यापूर्वी अधिसभेत एकमेकांना खेचाखेचीचे राजकारण असल्याने सर्वच संघटनांनी विद्यार्थी केंद्रबिंदू मानून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या निवडणूकीत सुटाला फारसे यश मिळाले नसले तरी काही ठिकाणी त्यांनी आपला झेंडा फडकवला आहे. तर विद्यापीठ विकास आघाडीच्या नेत्यांचे योग्य नियोजन त्यांच्या यशाचे गमक ठरले. सुटाचा बालेकिल्ला असलेल्या महाविद्यालयीन शिक्षक संघामध्येही आघाडीने दोन जागांवर बाजी मारली.

विद्यापीठ विकास आघाडीने सुटाची सत्ता मोडीत काढण्यासाठी विकासाचा मुद्दा पुढे करीत विजय मिळवला. विद्यापीठ विकास मंचने गेल्या तीन वर्षापासून काही शिक्षकांची पदनिश्चिती करण्यासाठी मदत केली आहे. तर संशोधनासाठी एक खिडकी योजना करण्याचा मानस असल्याने मतदारांनी या संघटनेच्या डॉ. एन. बी. गायकवाड सर्वाधिक मतांनी निवडून दिले. मतदारांची संख्या मोठी असल्याने सर्वच आघाड्यांना मतांची जुळवा–जुळव करण्यासाठी धावपळ करावी लागली. निवडणूकीच्या अंतिम टप्प्यात राजकीय व्यूहरचना बदलत काही उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी त्यांची मनधरणी केली गेली. तर काही ठीकाणी अर्थपूर्ण घडामोडी करत मतदार नोंदणीपासून ते मतदाराला मतदान केंद्रापर्यंत आणून मतदान करून घेण्याची जबाबदारीही कांही-कार्यकर्त्यांवर सोपवण्यात आली होती. सुटाने चुकीच्या पध्दतीने कसे अर्ज भरले आहेत, हे विद्यापीठ प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यामुळे डॉ. प्रकाश कुंभार बिनविरोध निवडून आले.

निवडणूकीची प्रक्रिया सुरू असतानाच सुटातील अंतर्गत वादाचा मुद्दा चव्हाट्यावर आला. त्यामुळे विद्यापीठावर सुटाचे अस्तित्व राहणार का असे चित्र होते. तसेच विद्यापीठ विकास आघाडीच्या झेंड्याखाली तिन्ही जिल्ह्यातील शिक्षण संस्था व राजकीय पक्ष एकत्रित आले होते. सुटाकडे असलेल्या रयत शिक्षण संस्था व विवेकानंद शिक्षण संस्थाही आघाडीच्या तंबूत आणण्यात डॉ. संजय डी. पाटील, डॉ. क्रांतीकुमार पाटील यांना यश आले.

पान ४ पहा



- डॉ. संजय डी. पाटील, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हाती विद्यापीठाच्या राजकारणाची सूत्रे
- विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यापीठ विकासाचे मोठे आव्हान
- आजी माजी विद्यार्थी कृती समिती व विद्यापीठ विकास मंचची दमदार एंट्री

23 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकास आघाडीच्या नेत्यांची व्यूहरचना ठरली यशस्वी !

पान १ वरुन

तरीही संस्थाचालकांच्या विरोधात सुटातील प्राध्यापकांच्या एकजुटीचा एका अर्थाने विजयच झाला असे म्हणावे लागेल. कारण महाविद्यालयीन शिक्षक व विद्यापरिषदेने बालेकिल्ल्यावर आपले वर्चस्व कायम ठेवले. त्याचबरोबर धनदांडग्यांच्या विरोधात शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी कृती समितीची 'एन्ट्री' महत्वपूर्ण ठरली. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण त्यांचा पहिलाच अनुभव पुढच्या पुढील निवडणूकीसाठी फायदेशीर ठरणार आहे. विद्यापीठ विकास मंचने गेल्या तीन वर्षापासून विद्यापीठावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले होते. तसेच भाजपच्या पाचशे कार्यकर्त्यांचा मोठा फौजफाटा निवडणूक प्रक्रियेत मदतीला असूनही विकास मंचला पूर्णपणे यश मिळवता आले नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत यापूर्वी ठराविक संस्थाचालक प्राचार्यांना लक्ष्य केले जात होते. त्यांच्या विरोधात सिनेटमध्ये ठराव आणून बदनामीचे राजकारण केले जायचे. तसेच महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्यासाठी अडचणी निर्माण केल्या जात होत्या. त्यामुळे शिक्षक, प्राचार्य आणि संस्थाचालकांमध्ये गैरसमज होते. गेल्या १० वर्षापासून विकास आघाडीने सकारात्मक दृष्टीकोन डोळ्यासमारे ठेवून प्रत्येक घटकाला न्याय दिला. म्हणूनच कित्येक महाविद्यालयांना नॅकचे 'अ' मानांकन मिळाले आहे. तसेच नवीन विषय सुरू करण्यास परवानगी, महाविद्यालयाला कायमस्वरूपी अनुदान अशी कामे केल्याने बऱ्याच जागा बिनविरोध निवडून आल्या. या कामाच्या जोरावरच विद्यापीठ विकास आघाडीला यश मिळाले. तसेच येत्या पाच वर्षात निवडणूकीच्या अजेंड्यावरील विद्यापीठ आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्याचे आश्वासन पूर्ण करण्याचे आव्हान आघाडीसमोर आहे.

यंदाच्या विद्यापीठ निवडणूकीत सोयीचे राजकारण करणाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात असल्याचे लक्षात आले. पदवीधर मतदारसंघात अभाविपला जास्त जागा पाहिजे होत्या त्यामुळे सुरूवातीच्या काळात विकास आघाडीच्या विरोधात अभाविपने प्रचार करण्यास सुरूवात केली होती. मात्र तडजोडीच्या राजकारणात अभाविपने विद्यापीठ विकास मंचच्या माध्यमातून विद्यापीठ शिक्षकांची एक जागा पदरात पाडून घेतली. तर राज्यपाल नियुक्त कोट्यातून अमित कुलकर्णी, इंडीयन इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रिअल इंजनिअरींगचे डॉ. विवेक खान्जोडे या दोन उमेदवारांची वर्णी लागली. एकंदरीत पदवीधरमधील चार व विद्यापीठ शिक्षकांमध्ये एक आणि राज्यपाल कोट्यातील दोन अशा सात जागा अभाविपला मिळाल्या. यापूर्वी विद्यापीठात अभाविपचा एकच उमेदवार होता. यंदा मात्र सात जागांची बाजी मारल्याने अभाविपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 NOV 2017 तरुण भारत

# विद्यापीठ निवडणूक मतमोजणी सुरळीत

## विद्यापीठातर्फे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी आभार मानले

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठ निवडणूकीच्या निकालामध्ये अभ्यास मंडळे, नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य, संस्थाचालक व विद्यापीठ शिक्षक गटासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये 'विद्यापीठ विकास आघाडी"ने बाजी मारली. तर सहा अभ्यास मंडळे, तीन महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्यापरिषदेवर सुटाने आपले वर्चस्व कायम ठेवले. आजी-माजी विद्यार्थी संघटनेला पदवीधरमधील एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही.

तब्बल २४ तास चाललेल्या मतमोजणीत गोंधळ झाला नाही. मतमोजणीत सर्वच घटकांनी शांतता ठेवल्याने विद्यापीठाने सर्व विद्यार्थी, शिक्षक, सर्व संघटनेचे नेते, कार्यकर्ते यांचे आभार मानले. या पार्श्वभूमीवर सुटा, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी संघटनेच्या नेत्यांनी पत्रकाव्दारे प्रतिक्रिया दिल्या.

विद्यापीठ निवडणूक हा माझ्यासाठी नवीन उपक्रम होता. शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांशी संवाद साधून त्यांच्या सल्ल्याने निवडणूक सुरळीत पार पडली. पुढच्यावेळी निवडणुकीमध्ये पूर्णपणे पारदर्शकता आणणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत मी स्वत: २४ तास कार्यरत होतो. या कालावधीत कोठेही गोंधळाचे वातावरण निर्माण झाले नाही. त्यामुळे सर्व उमेदवार, संघटना कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचे आभार. तसेच निवडून आलेल्या उमेदवारांनी विद्यार्थी केंद्रीत दृष्टीकोन ठेवून काम करावे, अशी अपेक्षा

**-डॉ. विलास नांदवडेकर**
**(कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा(सिनेट) निवडणूक २०१७ मधील नोंदणीकृत पदवीधर गटामध्ये आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या उमेदवारांना मतदान केल्याबद्दल मतदारांचे आभार. कोणताही राजकीय पाठिंबा, शिक्षण संस्था तसेच आर्थिक परिस्थिती नसताना गेल्या १५ वर्षाच्या सामाजिक कार्याच्या जोरावर संघटनेने ही निवडणूक लढविली. अपयश आले असले तरी पुढच्या निवडणूकीसाठी पूर्वी पेक्षा जोमाने व उत्साहानें काम करण्याची ताकत मतदारांनी दिली.

**- डॉ. प्रविण कोडोलीकर**
**( विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती)**

विद्यापीठ अभ्यास मंडळातील सहा जागांसह महाविद्यालयीन शिक्षक संघावर सुटाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. तसेच सुटाचा बाले किल्ला असलेल्या विद्या परिषदेवर एकहाती सत्ता मिळवण्यासाठी सर्व मतदारांनी सहकार्य केले. त्यामुळे सुटा संघटना व मतदारांतर्फे सर्व मतदारांचे आभार.

**- डॉ. आर. जे. कोरबू**
**(सुटा सहकार्यवाह)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 NOV 2017
लोकमत

# विद्यार्थी मंडळ निवडणुकीसाठी प्रतीक्षाच

## शिवाजी विद्यापीठ : अधिसभेवरील दोन जागा राहणार रिक्त; विद्यार्थी संघटनांतून नाराजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे विद्यापीठ विद्यार्थी मंडळावर सदस्यांची नियुक्ती करण्याचे सरकारने ठरविले आहे. त्यामुळे आता सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी मंडळ हे अध्यक्ष, सचिव, सदस्यांशिवाय कार्यरत असणार आहे. त्यासह नव्या अधिसभेवरील विद्यार्थी मंडळासाठीच्या दोन जागा किमान वर्षभर रिक्त राहणार आहेत.

विद्यापीठाचे विद्यार्थी मंडळ हे सन २०१४ मध्ये कार्यरत होते. यानंतर विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाने २०१५-१६ च्या निवडणुकीचा कार्यक्रम ३० जुलै २०१५ रोजी जाहीर केला. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार गुणवत्तेच्या आधारावर या निवडणुका होणार होत्या. मात्र, काही अपरिहार्य कारणामुळे या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती दिली असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केले. यानंतर नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही, निवडणुकांसाठी परिनियमाच्या उपलब्धतेची प्रतीक्षा या कारणांमुळे या मंडळाची निवडणूक लांबणीवर पडली. यामध्ये दोन वर्षे सरली. नवीन विद्यापीठ कायदा दि. १ मार्च २०१७ रोजी लागू झाला. यावेळी विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका घेण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केले. त्यामुळे दोन वर्षांपासून निवडणुकांच्या प्रतीक्षेत असलेल्या विविध विद्यार्थी संघटनांनी तयारी सुरू केली. मात्र, आता पुन्हा राज्यातील विविध विद्यापीठांतील अधिसभा व अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू असल्याने विद्यार्थी मंडळावरील निवडी पूर्वीप्रमाणे करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला.

या निर्णयामुळे विद्यार्थी संघटनांतून नाराजी व्यक्त होत आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभेवर विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांना प्रतिनिधित्व मिळते. पण, सध्या विद्यार्थी मंडळाच्या निवडी करणे शक्य नसल्याने वर्षभर अधिसभेवरील संबंधित दोन जागा रिक्त राहणार आहेत.

> “शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका गेल्या तीन वर्षांपासून झालेल्या नाहीत. याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. या निवडणुका कोणत्या पद्धतीने घ्यावयाच्या याचा आराखडा सरकारकडून निश्चित होत नसल्याचे दिसते. त्यामुळे या निवडणुका लांबणीवर पडत आहेत. विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन सरकारने या निवडणुका लवकर घेण्याबाबत कार्यवाही करावी.
>
> **- मंदार पाटील**, शहराध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

> विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकांबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून कोणताही आदेश विद्यापीठाला मिळालेला नाही. या विभागाच्या आदेशानुसार निवडणुकांबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> **- डॉ. आर. व्ही. गुरव,** संचालक, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2017
पुढारी

# व्यवस्थापन परिषदेसाठी इच्छुकांची 'फिल्डिंग'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाची निवडणूक झाली. आता निवडून आलेल्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेची रचना केली जाते. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेवर वर्णी लागावी यासाठी इच्छुकांनी आपापल्या आघाडी प्रमुखांकडे फिल्डिंग लावली आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत विकास आघाडीकडे सिनेटचे बहुमत आहे. अभ्यास मंडळावरही आघाडीचे वर्चस्व आहे. याउलट विद्या परिषदेच्या सर्वच जागा 'सुटा'ने जिंकल्या आहेत. सिनेटमध्ये महाविद्यालयीन शिक्षक गटातील आठ जागाही 'सुटा'कडे आहेत. आघाडीकडे जास्त जागा असल्याने व्यवस्थापन परिषदेवर त्यांचे वर्चस्व राहील, हे स्पष्ट आहे. 'सुटा'कडूनही बहुमत असलेल्या गटातून प्रतिनिधित्व परिषदेवर निवडून जाईल. व्यवस्थापन परिषदेवर निवड होण्यासाठी मतदान प्रक्रिया केली जाते. यासाठी निवडून आलेले सदस्य मतदान करतात. निवडणुकीद्वारे तसेच स्वीकृत सदस्यांना व्यवस्थापन परिषदेवर संधी दिली जाते. व्यवस्थापन परिषदेवरील वर्णी ही महत्त्वाची असल्याने निवडून आलेल्यांनी आता यासाठी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे.



शिवाजी विद्यापीठातून

### व्यवस्थापन परिषद

*प्राचार्य गट-२, प्राध्यापक-२, संस्था प्रतिनिधी-२, पदवीधर-२, विद्या परिषद-२ आदी गटानुसार प्रतिनिधित्व असेल. यासाठी मतदान होईल.*

23 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ : परीक्षा विभागाची कार्यवाही; सखोल चौकशी करणार : महेश काकडे

# प्रश्नपत्रिकेतील मजकूर प्रसारित : तिघांची चौकशी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मॅकेनिकल विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्नांशी मिळताजुळता मजकूर व्हॉटस्‌ॲपवरुन प्रसारित केल्याच्या संशयावरुन तीन विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठाने बुधवारी चौकशी केली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून चौकशीची कार्यवाही करण्यात आली.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. या परीक्षेतील अभियांत्रिकी विद्याशाखेतील काही विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील मजकूर हा पेपरपूर्वी आणि नंतर व्हॉटस्‌ॲपवरुन प्रसारित होत असल्याची निनावी तक्रारी परीक्षा विभागाकडे आल्या होत्या. यानुसार संबंधित स्वरुपातील चौकशी या विभागाकडून सुरु होती.

यावाबत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले, विभागाकडून गोपनीयपणे चौकशी सुरु होती. यात अभियांत्रिकीच्या मॅकेनिकल विषयाच्या पाचव्या सत्रातील पेपरमधील प्रश्नांबाबतचा काही मजकूर प्रसारित झाल्याचे बुधवारी आढळले. या अनुषंगाने तीन विद्यार्थ्यांची चौकशी केली आहे. या विद्यार्थ्यांच्या पालकांनादेखील बोलवून घेतले होते. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. ते प्रकरण विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीसमोर ठेवून दोषी सापडल्यास त्यांच्यावर माहिती व तंत्रज्ञान कायद्यानुसार कारवाई केली जाईल. प्रश्नपत्रिका वितरणासाठी परीक्षा मंडळाने राबविलेली 'एसआरपीडी' पद्धती अत्यंत गोपनीय आहे. या गोपनीयतेचा जर कोणी भंग केल्याचा प्रकार निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

बुधवारी मॅकेनिकलच्या पाचव्या सत्रातील प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्नांशी मिळताजुळता मजकूर व्हॉटस्‌ॲपद्वारे प्रसारित झाल्याचे निदर्शनास आले.



त्याबद्दल संशयावरुन परीक्षा मंडळाने तीन विद्यार्थ्यांची चौकशी केली. काही विषयांच्या पेपरमधील प्रश्नांशी मिळताजुळता मजकूर व्हॉटस्‌ॲपवरुन प्रसारित होत असल्याच्या निनावी तक्रारी विभागाकडे आल्या होत्या.

23 NOV 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेपरमधील मजकूर व्हायरल; तिघांची चौकशी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इंजिनिअरिंगच्या प्रश्नपत्रिकेतील मजकूर व्हायरल होत असल्याच्या तक्रारीवरून बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने तिघा विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. प्रश्नपत्रिकेतील काही मजकूर वेळेपूर्वी व्हॉटस् अ‍ॅपवर व्हायरल होत असल्याची निनावी तक्रार परीक्षा विभागाकडे आली होती. यानंतर आज तीन परीक्षा केंद्रांवरून संशयित विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले.

**सखोल चौकशी सुरू**

आमच्याकडे प्रश्नपत्रिकेतील मजकूर बाहेर पडत असल्याची तक्रार आली होती. या तक्रारीनुसार सखोल चौकशी सुरू आहे. संबंधित तिघा विद्यार्थ्यांच्या पालकांनाही बोलावून घेतले होते. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. पेपरचा मजकूर व्हायरल करणाऱ्यांविरोधात माहिती-तंत्रज्ञान कायद्यानुसार कारवाई केली जाईल. आम्ही राबवत असलेली एसआरपीडी ही सिस्टिम अत्यंत गोपनीय आहे. तरीही जर चुकीचा प्रकार आढळून आल्यास थेट कारवाई केली जाईल. **- महेश काकडे,** परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ

आज मॅकेनिकल इंजिनिअरिंगचा पेपर होता. परीक्षेच्या वेळेपूर्वी तासभर आधी प्रश्नपत्रिकेतील मजकूर सोशल मीडियावरून व्हायरल होत असल्याची तक्रार प्रशासनाकडे आली होती. या तक्रारीवरून आज शोधसत्र सुरू केले. ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलवरील डेटा ताब्यात घेण्यात आला आहे. हा प्रकार खरा असेल, तर या प्रकरणात साखळी कार्यरत आहे का, याची सखोल चौकशी करण्याची गरज आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2017
तरुण भारत

# पेपरफुटीच्या संशयावरून तीन विद्यार्थ्यांची चौकशी

## अभियांत्रिकी प्रश्नपत्रिकेतील प्रश्न व्हॉट्स ॲपवर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पेपरफुटीच्या तक्रारीवरून बुधवारी जिल्ह्यातील एका अभियांत्रिकी महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाने चौकशी केली. मेकॅनिकलच्या प्रश्नपत्रिकेतील काही मजकूर व्हॉट्स ॲपवर व्हायरल झाल्याने ही कारवाई केली. परीक्षेत गोपनीयता राखण्यासाठी सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिवरीच्या (एसआरपीडी) माध्यमातून प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना पाठवल्या



जातात. असे असतानाही पेपर समाज माध्यमावर व्हायरल झाल्याची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे. आता याप्रकरणी परीक्षा प्रमाद समिती (लॅप्सेस) समोर चौकशी करून अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

पान ६ पहा

# पेपरफुटीच्या संशयावरून तीन विद्यार्थ्यांची चौकशी

पान १ वरून

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागातर्फे गेल्या वर्षभरापासून प्रश्नपत्रिका 'एसआरपीडी'च्या माध्यमातून पाठवल्या जातात. सुरूवातीला अभियांत्रिकी विषयांच्या प्रश्नपत्रिका पाठवल्या जात होत्या. किरकोळ गोंधळानंतर हा प्रयोग यशस्वी झाला. गेल्या आठवड्यात एमकॉमच्या प्रश्नपत्रिका वेळेत न मिळाल्याने काही प्रमाणात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. बुधवारी तर चक्क अभियांत्रिकीच्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न व्हॉट्स ॲपवर व्हायरल झाल्याचे निदर्शनास आले. इचलकरंजी, जयसिंगपूर, गडहिंग्लज येथे प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून फिरत आहेत. यासंदर्भात परीक्षा विभागाकडे आलेल्या तक्रारीवरून या विद्यार्थ्यांची चौकशी सुरू केली आहे.

संबंधित तीन विद्यार्थ्यांचे मोबाईल जप्त करून त्यांची चौकशी परीक्षा प्रमाद समिती (लॅप्सेस)तर्फे सुरू केली आहे. या तीन विद्यार्थ्यांच्या पालकांनाही यासंदर्भात माहिती देण्यात आल्याचे समजते.

**संबंधितांवर होणार कारवाई : महेश काकडे**

शिवाजी विद्यापीठातर्फे पाठवण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकेवर संबंधित महाविद्यालयाचा वॉटरमार्क असतो. अभियांत्रिकीच्या प्रश्नपत्रिका व्हॅट्स ॲपवर फिरत असल्याची तक्रार आल्याने तीन विद्यार्थ्यांची चौकशी सुरू केली आहे. सोशल मिडीयावर फिरणाऱ्या प्रश्नपत्रिकेवर संबंधित महाविद्यालयाचा वॉटर मार्क दिसल्यास महाराष्ट्र एक्झामिनेशन ॲक्टनुसार संबंधित महाविद्यालयावर कारवाई केली जाईल. आम्ही राबवत असलेली 'एसआरपीडी' अत्यंत गोपनीय आहे. प्रश्नपत्रिकेतील मजकूर व्हायरल करणाऱ्यावर माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2017
पुण्यनगरी

# आविष्कार २०१७ अंतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे तंत्रज्ञानाचा विकास व उपयोग राष्ट्रीय कार्यासाठी कसा करता येईल. याकरिता विद्यार्थी तसेच संशोधन कक्ष समन्वयकांसाठी आविष्कार अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले होते.

, विद्यार्थ्यांना सृजनशील कसे बनवता येईल, आयुष्यात शिक्षणाचा उपयोग कसा करता येईल. विद्यार्थ्यांकडून तंत्रज्ञान नवनिर्मिती होण्यासाठी लागणाऱ्या शैक्षणिक प्रणालीतील बदल याविषयी शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले.

केवळ संशोधन म्हणजे इनोव्हेशन नव्हे, तर संशोधन जेव्हा समाजामध्ये वापरले जाते तेव्हाच ते यशस्वी होते. त्यासाठी या कल्पनेचा माईंड टू मार्केट प्रवास जलद व्हावा लागतो आणि ती किती शाश्वत आहे, यावरही तिचे यश अवलंबून असते, असे प्रतिपादन तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले. तसेच कमीत कमी साधनसामग्रीतून जास्तीत जास्त मिळवणे, जुन्यापासून नवनिर्मिती, संवर्धन व व्हॅल्यूएशन करून उत्तम दर्जाचे अत्यल्प दरामध्ये यंत्रनिर्मिती इनोव्हेशन, संशोधनाचा वापर करून करता येईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे डॉ. ए. व्ही. घुले यांनी केले.

या कार्यशाळेचे नियोजन व व्यवस्थापन तंत्रज्ञान अधिविभागामधील के. बी. दळवी, डॉ. यू. एल. बोंबले, एम. एन. व्हटकर, वाय. एस. व्हटकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2017
पुढारी

# 'आविष्कार २०१७'अंतर्गत विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे तंत्रज्ञानाचा विकास व उपयोग हा राष्ट्रीय कार्यासाठी कसा करता येईल, याकरिता विद्यार्थी, तसेच संशोधन कक्ष समन्वयकांसाठी 'आविष्कार २०१७'अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. ए. एम. गुरव आदींनी यावेळी मार्गदर्शन केले.

